# दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई.


(नोंदणी क्र.बी ओ एम/आर एस आर/३५४/३.६.६७)

युनियन बँक बिल्डिंग, ४ था मजला, रुम नं.१९, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. दूरध्वनी क्र. २२६२९४८४, ३५११४२४६, ३५११४२५२

WhatsApp No.: ९८३३१८५५८४ / ईमेल : ubicrsoc@gmail.com / Website : unionbankcreditsociety.com / Play store : UBI CR SOCIETY





# ५५ वा वार्षिक अहवाल

# २०२२-२०२३

## ५६ वर्षांची यशस्वी वाटचाल

# दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई.

## व्यवस्थापक समिती



श्री. राजेश मतकरी – अध्यक्ष



श्री. भट्टूसिंग ठाकूर
उपाध्यक्ष



श्री. प्रशांत सुर्वे
मानद् सचिव



श्री. प्रविण सोनावले
सहसचिव



सौ. शिवांगी साळुंके
खजिनदार

## संचालक मंडळ



श्री. हेमंत हेटे



श्री. हरिश तायडे



श्री. पांडुरंग भंगाळे



श्री. भूपेंद्र पाटोळे



श्री. सचिन नरहरी



श्री. हरिभाऊ कोगदे



श्री. रामचंद्र कासारे



श्री. प्रसन्न दामले



श्री. प्रशांत मोहिते



श्री. रोहन गोडसे



श्री. विष्णू कोकणे



श्री. अनिकेत पेवेकर



सौ. प्रियंका म्हापणकर



श्री. विष्णू टोपले
तज्ञ संचालक



श्री. नयन सोळंकी
कार्यलक्षी संचालक



श्री. निलेश गायकवाड
कार्यलक्षी संचालक

# दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि., मुंबई

(नोंदणी क्र.बी ओ एम/आर एस आर/३५४/३.६.६७)
युनियन बँक बिल्डिंग, ४ था मजला, रुम नं.१९, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.दूरध्वनी क्र. २२६२९४८४, ३५११४२४६/५२
WhatsApp No.: ९८३३१८५५८४ / ईमेल : ubicrsoc@gmail.com / Website : unionbankcreditsociety.com / Play store : UBI CR SOCIETY

## ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**(फक्त सभासदांसाठी)**

दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. संस्थेची सन २०२२-२३ यावर्षाची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२३ रोजी सायं ठीक ४:३० वाजता रामा अ‍ॅण्ड सुंदरी वाटुमूल ऑडिटोरीयम, किशनचंद चेलाराम कॉलेज (के. सी. कॉलेज), दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई -२० येथे आयोजित करण्यात आली आहे. कृपया सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

### सभेपुढील विषय सुची

१. दिनांक ०४ जून, २०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांची गैरहजेरी क्षमापित करणे.
३. सन २०२२-२०२३ यावर्षाच्या मान्य अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
४. सन २०२२-२०२३ यावर्षाचा अहवाल, नफा-तोटा व ताळेबंद पत्रकांस मंजुरी देणे.
५. सन २०२२-२०२३ यावर्षासाठी मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे.
६. सन २०२२-२०२३ यावर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
७. सन २०२३-२४ वर्षाकरीता वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.
८. सन २०२३-२४ या वर्षाकरीता अंतर्गत व कर लेखा-परीक्षकांची नेमणूक करणे व मानधन ठरविणे.
९. सन २०२३-२४ या वर्षाच्या मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
१०. पोटनियम क्र. क-१.३, फ-१.३, फ-१.४, फ-१.८ मधील दुरुस्तीस मान्यता देणे.
११. संस्थेत नवीन सॉफ्टवेअर प्रणाली घेण्यास मान्यता देणे.
१२. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणा-या विषयांवर विचार करणे.

व्यवस्थापक समितीच्या आदेशावरुन,

(**प्रशांत सुर्वे**)
मानद् सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : २५/०७/२०२३

**सूचना :**

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा अर्ध्या तासाने घेण्यात येईल व त्यास गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयासंबंधी काही प्रश्न असल्यास ते दि.०३/०८/२०२३ पर्यंत लेखी स्वरुपात आणून देणे.
३. संस्थेचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक संस्थेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत सभासदांना पाहण्यास उपलब्ध आहे. तसेच संस्थेच्या वेबसाईटवर व वॉट्स ॲपद्वारे उपलब्ध होतील.
४. उपविधी क्र. घ.१.३ (४) अनुसार लाभांश जाहीर झालेल्या तारखेपासून तीन वर्षाच्या मुदतीत स्विकारावा अन्यथा संस्थेच्या राखीव निधीत जमा करण्यात येईल. २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ सालातील लाभांश अद्याप घेतला नसल्यास ३१ डिसेंबर, २०२३ पुर्वी संस्थेत संपर्क करावा.

**२०२३-२४ सालाचे सभासद सहकार प्रशिक्षण हे वार्षिक सभेच्या ठिकाणी दुपारी ३:४५ वाजता आयोजित केले आहे**

# दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि., मुंबई



**सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,**

सर्वप्रथम मी स्वतः व माझे नवनियुक्त संचालक मंडळ आमच्यावर आपण विश्वास दाखवून **जनसेवा पॅनलला** निवडणूकीत भरघोस मतदान करुन पुन्हा एकदा संस्थेची प्रगती करण्याची संधी दिलीत त्याबद्दल मन:पूर्वक आभार मानतो.

दिनांक १० मार्च, २०२३ रोजी राज्य निवडणूक प्राधिकरणाच्या अधिकारांतर्गत संस्थेची निवडणूक प्रक्रिया राज्यात मुंबई, कोल्हापूर, पुणे, नाशिक, नगर, संभाजी नगर आणि नागपूर येथील मतदान केंद्रावर पार पडली. आपण सर्वांनी उत्स्फुर्तपणे मतदान करुन एकुण २६३७४ मतदानापैकी जनसेवा पॅनेलला २१३५१ इतकी मते देऊन एकहाती विजय मिळवून दिलात आपला हा विश्वास आम्ही सर्व संचालक निश्चितच सार्थ ठरवू.

प्रामाणिकपणे सांगायचे झाले तर, निवडणूकप्रक्रिया राबवून संस्थेचे आर्थिक नुकसान होऊ नये यासाठी आम्ही खूप प्रयत्न केले परंतू, आपल्यातीलच काही सभासदांनी पॅनलची उभारणी केल्याने निवडणूक झाली आणि जवळपास रुपये १४.९४ लाख इतका खर्च संस्थेला आला. परंतू आधीपासूनच खर्चाबाबतीत केलेली काटकसर कामी आली आणि संस्थेच्या व्यवहारावर याचा तितकासा परिणाम झाला नाही. आपणांस हे चालू वर्षाच्या आर्थिकपत्रकावरुन दिसून आले असेलच.

चालू वर्षी कर्जवितरणाच्याबाबतीत बरेच बदल झाले असून यामागची पार्श्वभूमी आपल्या सर्वांना ज्ञात असणे गरजेचे आहे. यापूर्वी संस्थेने युनियन बँकेकडून रु. १०० कोटीची कर्जसुविधा घेतली होती. नवीन सभासद नोंदणी व वाढती कर्जमागणी यामुळे ऑगस्ट २०२२ पर्यंत जवळपास ७५% कर्जउचल झाली. यामुळे संस्थेने बँकेकडे रु. १५० कोटीचा कर्जनूतनीकरण प्रस्ताव दिला होता. विविध अडचणींचा सामना करत यावर्षी जून २०२३ मध्ये बँकेने रु. १४५ कोटी मंजूर केले. परंतू, यादरम्यानच्या काळात निधी अभावी सभासद कर्जवितरणावर खूप मर्यादा आल्या व भविष्यात या सर्व बाबी आपण सर्वांनी समजून घेणे आवश्यक आहे. सकाळी अर्ज-दुपारी कर्ज हि संकल्पना म्हणजे प्रगती नसून, निधीचे योग्य नियोजन करुन संस्थेचा स्वनिधी वाढवून संस्था स्वावलंबी बनवणे यातच संस्थेचा आर्थिक उत्कर्ष आहे. यासाठी आपण सर्वांनी संस्थेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलून संस्थेतून कर्ज घेत असतानाच स्वत:हून ठेवी गुंतवणूक करुन संस्थेचा आर्थिक समतोल राखण्यासाठी व्यक्तीशः प्रयत्न करावेत.

**माहे नोव्हेंबर २०२२ पासून आम्ही सेवानिवृत्त होणा-या सभासदांचा सत्कार समारंभ** या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करत असून, आपण संस्थेला इतकी वर्षे केलेल्या सहकार्याची दखल घेऊन आपले संस्थेविषयी आलेले अनुभव ऐकत आहोत. भविष्यात सेवानिवृत्त होणा-या माझ्या सभासदांसाठी माझे नम्र आवाहन आहे. मध्यंतरीच्या काळात नाममात्र सभासदत्वाच्या बंदीच्या निर्णयात सुधारणा झाली असून, आपण सेवानिवृत्तीनंतर संस्थेत नाममात्र सभासद होऊन स्वेच्छेने ठेवींमध्ये सुरक्षित गुंतवणूक करु शकता. आपल्या गुंतवणुकीवर संस्था नक्कीच इतर सार्वजनिक व आर्थिक संस्थेपेक्षा जास्त व्याजदर देत आहे. आपण सुरुवातीपासून केलेले सहकार्य आपल्याकडून कायम मिळो हि विनंती.

आपली संस्था संगणकीकृत असून संस्थेने सभासदांच्या सोयीकरीता **मोबाईल-ॲप** सुरु केले आहे. परंतु, आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात बरोबरीने जात असताना अद्ययावत अशी सॉफ्टवेअर -प्रणाली संस्थेत आणण्याचा आमचा मानस आहे. जेणेकरुन आपल्याला घरबसल्या संस्थेशी व्यवहार करणे सुलभ होईल व मोबाईल-ॲपद्वारे आपल्या व्यवहाराच्या नोंदी त्वरीत पाहता येतील. या दिशेने आम्ही एक पाऊल उचलले असून युनियन बँकेची CAPS यंत्रणा संस्थेत जोडण्यात आली आहे. या पोर्टलद्वारे सभासदांच्या देय रकमा संस्थेतूनच देण्यात येत आहेत. याव्यतिरीक्त लवकरच सभासदांना मोबाईल-ॲपद्वारे रक्कम जमा करण्याची सुविधा देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

आपण आमच्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल माझ्यासह सर्व कार्यकारी मंडळाच्यावतीने मी आपला आभारी आहे. आपल्या संस्थेचे सर्व सन्माननीय सभासद, युनियन बँक व्यवस्थापन, माननीय सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय पुणे, माननीय जिल्हा उपनिबंधक कार्यालय मुंबई, वैधानिक लेखापरीक्षक, अंतर्गत लेखापरीक्षक आणि माझे कार्यकारी मंडळातील संचालक व संस्थेचे कर्मचारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

**श्री. राजेश मतकरी**

**अध्यक्ष**

# दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि., मुंबई



**सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,**

सर्वप्रथम नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत आम्हाला बहुमताने निवडून दिल्याबद्दल आपल्या सर्वांचे मन:पूर्वक आभार.....

संस्थेने ०३ जून, २०२३ रोजी ५६व्या वर्षात पदार्पण केले असून वर्षअखेर रु. २०२ कोटींचा एकत्रित व्यवसाय केला आहे. चालूवर्षी ५९६ नवीन सभासदांनी संस्थेत नोंदणी केली असून वर्षअखेर एकूण सभासदसंख्या ४५२२ आहे. सभासदवाढीचा वेग संस्थेवरचा आपला विश्वास दर्शवतोय आणि याच वेगाने लवकरच आपण ५०० कोटींचा टप्पा नक्कीच गाठू यासाठी येत्या काळात सर्वांनी मिळून जास्तीत जास्त सभासद वाढविण्यासाठी प्रयत्न करु. बाहेरील राज्यातूनदेखील संस्थेचे सभासद होण्याची मागणी होत असून यादृष्टीने येत्या काळात संस्थेचे कार्यक्षेत्र वाढवून मल्टीस्टेट करण्याबाबत आम्ही चाचपणी करीत आहोत.

सन २०२२-२३ सालाची आर्थिकपत्रके आपल्यासमोर मांडताना मला आपल्या निदर्शनास आणून द्यायचे आहे कि, यावर्षी निवडणूक खर्च, आयकर, तरतूदीवरील खर्च व बँककर्ज उचल प्रक्रिया खर्च असे मोठे खर्च होऊनदेखील योग्य आर्थिक नियोजन, खर्चातील काटकसर, निधी व्यवस्थापन यांची योग्य सांगड घालून आम्ही आपल्या नफ्याचे गणित योग्य राखले आहे. चालूवर्षी संस्थेला व्याजातून रु. १४.४९ कोटी उत्पन्न मिळाले, गेल्यावर्षीच्या तुलनेत उत्पन्नात रु. ४.८० कोटीची वाढ झालेली आहे. तसेच खर्चास, देय व्याज रु. ९.३४ कोटी, व्यवस्थापन खर्च रु. १.१२ कोटी, इतर तरतुदी रु. ३० लाख असे एकूण रु. १०.७७ कोटी खर्च होऊन संस्थेला वर्षअखेर रु. ३.७२ कोटी नफा झाला आहे.

संस्थेच्या ताळेबंदपत्रकात गतवर्षीच्या तुलनेत रु. ५६ कोटींनी वाढ झाली असून, विशेषत: संस्थेचा स्वनिधी वाढविण्याचे आमचे प्रयत्न असून यादृष्टीने जुलै २०२२ मध्ये मासिक वर्गणीत वाढ करुन रु. १०००/- करण्यात आली होती. तसेच ठेवी वाढविण्यासाठी ठेवींवरील व्याजदरात आकर्षक वाढ केली आहे. सेवानिवृत्त होणा-या सभासदांसाठी देखील आम्ही गुंतवणुकीवर वार्षिक ९.५०% व्याजदर देत असून, आपण सर्वांनी सेवानिवृत्तीनंतर स्वत: किंवा आपल्या परिचयाच्या सभासदांना संस्थेत गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करा.

चालू वर्षी संस्थेने युनियन बँक व्यवस्थापनाकडून रु.१४५ कोटी कर्जमंजुरी घेतली असून, नवीन आर्थिक पतधोरणानुसार संस्थेला बँककर्जावर वाढीव व्याजदर लागला आहे, पर्यायाने सभासद कर्जावरील व्याजदरात वाढ केली आहे. सभासद कर्ज उचलीचे प्रमाणात लक्षणीय वाढ होत असून गतवर्षीच्या तुलनेत रु. ५७ कोटीची वाढ होऊन वर्षअखेर रु. १८१ कोटी कर्ज येणे बाकी आहे. एकंदरीत सदरची आकडेवारी पाहता सभासद कर्जात होणारी वाढ हि स्वनिधीत होणा-या वाढीपेक्षा जास्त असल्याने संस्थेला बँकेच्या कर्जावर अवलंबित राहावे लागत आहे. या परिस्थितीवर नियंत्रण करण्याकरीता आम्ही नवीन सभासद कर्जमंजुरीच्या कालावधीत बदल केले आहेत. जेणेकरुन भविष्यात आपल्याला संस्थेच्या स्वनिधीतून कर्जवितरित करुन व्याजाचे दर कमी करणे शक्य होईल.

आपल्या संस्थेचे सर्व सन्माननीय सभासद, युनियन बँक व्यवस्थापन, माननीय सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय पुणे, माननीय जिल्हा उपनिबंधक कार्यालय मुंबई, वैधानिक लेखापरीक्षक, अंतर्गत लेखापरीक्षक आणि माझे कार्यकारी मंडळातील संचालक व संस्थेचे कर्मचारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

**श्री. प्रशांत सुर्वे**
**मानद् सचिव**

# दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि., मुंबई



**सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,**

सर्वप्रथम नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत आम्हाला बहुमताने निवडून दिल्याबद्दल आपल्या सर्वांचे मन:पूर्वक आभार.....

संस्थेच्या विविध योजनांचा आपल्या माहितीसाठी थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे सादर करीत आहे. यावरुन आपल्या निदर्शनास येईल की, संस्थेने या आर्थिक वर्षात उत्तम अशी प्रगती केली आहे. सभासदत्व, भागभांडवल, दीर्घ मुदत कर्ज, अल्प मुदत कर्ज, धनलक्ष्मी मुदत ठेव इत्यादीमध्ये आपणांस प्रकर्षाने वाढ झालेली निदर्शनास येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **सभासदत्व** : वर्षारंभी सभासद संख्या ४२९१ होती. अहवालवर्षात ५९६ नविन सभासद दाखल झाले व ३६५ सभासदांनी सभासदत्व बंद केल्यामुळे ३१ मार्च २०२३ अखेर सभासद संख्या ४५२२ इतकी झालेली आहे व नाममात्र सभासद संख्या २१ इतकी आहे. | 1 | **Membership** : Our membership stands from 4291 as on 31st March 2022 to 4522 as on 31st March 2023, The increase of 596 new members & resignation of 365 members due to retirement. Nominal members 21. |
| २ | **भाग-भांडवल** : अहवालसाली संस्थेच्या वसूल भागभांडवलामध्ये रु.७,१६,७०,०००.०० इतकी वाढ होऊन गतवर्षी असलेले रु. २९,९६,२५,०००.०० वसुल भागभांडवल अहवालसाली रु.३७,१२,९५,०००.०० इतके झालेले दिसून येते. | 2 | **Share Capital**: During this Financial Year the Share Capital increased by Rs.7,16,70,000.00 and stood at Rs. 29,96,25,000.00 against that of Rs. 37,12,95,000.00 of the last year. |
| ३ | **दीर्घ मुदत कर्ज** : वर्षारंभी रु. १,२४,४६,७३,३९०.७५ ची कर्जे येणे बाकी होती आणि अहवालसाली ९१८ सभासदांना रु.१,२२,४९,०४,६१३.१४ ची नविन कर्जे मंजूर करण्यात आली व रु. ६६,०८,०७,७२०.६९ ची कर्ज वसूली होऊन वर्षाअखेरीस रु. १,८०,८७,७०,२८३.२० ची दीर्घ मुदत कर्जे येणे बाकी आहेत. | 3 | **Long Term Loans**: At the beginning loan outstanding stood at Rs.1,24,46,73,390.75 during the year 918 members were sanctioned loans of Rs. 1,22,49,04,613.14 & after the recoveries of Rs.66,08,07,720.69 the Long loans at the end of the year were Rs.1,80,87,70,283.20 |
| ४ | **अल्प मुदत कर्जे** : वर्षारंभी रु.१२,७५,६७९.७२ ची अल्प मुदत कर्जे येणे बाकी होती आणि अहवालसाली १६७ सभासदांना रु. ७१,०४,३६७.०० ची नविन कर्जे मंजूर करण्यात आली. अहवालसालात सदर खात्यात रु.५९,७५,७०८.०० ची वसूली जमा होऊन वर्षाअखेरीस रु.२४,०४,३३८.७२ ची अल्प मुदत कर्जे येणे बाकी आहेत. | 4 | **Short Loans**: At the beginning of this financial year, the Short loans outstanding stood at Rs.12,75,679.72 and 167 members were sanctioned new loans of Rs.71,04,367.00. After recoveries of Rs.59,75,708.00 the end of year the outstanding of Short loans were Rs.24,04,338.72 |
| ५ | **मृत सभासद कल्याणकारी योजना** : या योजने अंतर्गत मृत सभासदांच्या वारसाला रु. ४.०० लाख आर्थिक मदत दिली जाते. अहवालसाली ०५ मृतसभासदांच्या वारसांना या योजनेतून रु.२० लाखाची आर्थिक मदत देण्यात आली. | 5 | **Members Death Benevolent Scheme**: In this scheme an aid of Rs. 4.00 lakhs is given to legal hairs of deceased member. During the financial year 2022-23 we have given Rs. 20 Lakh as an aid to legal heirs of 05 deceased members. |
| ६ | **शैक्षणिक गुणगौरव निधी योजना** : अहवालसाली या योजने अंतर्गत शालांत परिक्षा, उच्च माध्यमिक परिक्षा आणि पदवी परिक्षेत ७५ टक्के आणि अधिक गुणांकानी उत्तीर्ण झालेल्या सभासदांच्या पाल्यांना उत्तेजनार्थ रु.६३,०००/- ची रोख बक्षिसे सभासदांच्या खात्यात जमा करण्यात आली. | 6 | **Education Welfare Scheme** : In this scheme we give cash incentives to the ward of members, who have passed Secondary & Higher Secondary School and Graduation Examination with 75% & above. During the year Rs.63,000/- were given directly credited to the members account. |
| ७ | **सभासद सहकार प्रशिक्षण शिबिर** : केंद्रशासनाने सहकार कायदयामध्ये केलेल्या ९७व्या घटनादुरुस्तीन्वये, संस्थेच्या सभासदांना कामकाजाविषयी सर्वांगीण माहिती व्हावी याकरीता संस्थेतर्फे सभासद प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे बंधनकारक आहे त्याअनुषंगाने येत्या वार्षिक सभेत सहकार तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सभासद सहकार प्रशिक्षण शिबिर घेण्याचा आमचा मानस आहे. | 7 | **Member Co-operative Training Programme**: As per the 97th amendment it has been mandatory for all credit societies to educate the members through conducting training programmes. As per guidelines, we proposed to hold members co-operative training programme at coming Annual General Meeting. |
| ८ | **धनलक्ष्मी मुदत ठेव योजना** : वर्षारंभी या योजनेअंतर्गत रु. ८,८७,०९,६२१.०० ठेवी जमा होत्या. अहवालसाली सभासदांनी रु. ७,८६,५६,१८९.०० ठेवी संस्थेकडे गुंतविल्या आहेत व मुदतसमाप्ती नंतर रु. ६,९८,४६,१२०.०० ठेवी परत करण्यात येऊन वर्षअखेर संस्थेकडे रु. ९,७५,१९,६९०.०० ठेवी जमा आहेत. | 8 | **Dhanlaxmi Fixed Deposit Scheme**: At the beginning Rs. 8,87,09,621.00 deposits was outstanding under this scheme. During the year new deposits of Rs.7,86,56,189.00 have been invested and Rs.6,98,46,120.00 worth of deposits were refunded on maturity. At the end of the year outstanding deposits were at Rs.9,75,19,690.00 |
| ९ | **धन्वंतरी वैद्यकीय योजना** : या योजनेअंतर्गत २२ सभासदांना रु. १,८१,१५५.०० ची आर्थिक मदत देण्यात आली. अहवाल वर्षअखेर या योजनेत शिल्लक रक्कम रु.१,६५,००,७८६.६९ जमा आहेत. | 9 | **Dhanwantari Medical Aid Scheme**: An amount of Rs.1,81,155.00 was given as financial support under the scheme to 22 members. At the end of the year Dhanwantari Medical Aid Fund is Rs.1,65,00,786.69 |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | **जामिन हमी योजना** : या योजनेअंतर्गत, सभासदाचे आजारपणामुळे कर्ज थकीत असल्यास नियमानुसार तात्पुरते कर्जाचे हप्ते भरण्याची तरतूद आहे. शिवाय मृत सभासदाच्या कर्जफेडीकरीता रु.८.०० लाखाची मदत देण्यात येते. चालुवर्षी या योजनेतून १ सभासदाचे रु.८,००,०००.०० इतके कर्ज माफ केले असून वर्षाअखेर या निधीमध्ये रु.३,८१,२४,४५६.०४ इतकी शिल्लक आहे. | 10 | **Surety Guarantee Scheme**: Loan of members remain unpaid/overdue due to serious ailments, then the instalment upto six months can be adjusted from this fund. In case death of member, the society will give financial assistance upto Rs. 8.00 lakh to repay the loan. During current year Rs.8,00,000.00 paid towards loan repayment of 1 deceased member. At the end of the year is Rs. 3,81,24,456.04 |
| ११ | **कर्जमुक्ती हमी योजना** : या योजनेअंतर्गत कर्जदार सभासद मृत पावल्यास रु.१४.५० लाखा वरील कर्ज माफ केले जाते. याकरीता सभासदाकडून वार्षिक नाममात्र शुल्क आकारले जाते. वर्षाअखेर रु. १,५२,०२,८३०.३७ इतकी शिल्लक आहे. | 11 | **Karj mukti hami yojana** : In this Scheme loan above Rs.14.50 lacs will be adjusted on death of the member (lonee). We collect nominal amount from member(loanee). In this scheme at the end of the year balance is Rs.1,52,02,830.37 |
| १२ | **विश्रामगृह खर्च पुरक योजना** : या योजने अंतर्गत सभासदांकरीता नाममात्र दरात विविध विश्रामगृहांची सोय उपलब्ध केली आहे. या निधीमध्ये वर्षाअखेर रु.२१,२०,९३१.०० इतकी रक्कम शिल्लक आहे. | 12 | **Holiday Home Scheme(Tie-up)** : Under this scheme member can avail Holiday Home facility at concessional rate. Balance amount at the end of the year is Rs.21,20,931.00 |
| १३ | **लाभांश** : आमच्या मान्यवर सभासदांना ३१ मार्च २०२३ पर्यंतच्या जमा भागभांडवलावर ९% लाभांश म्हणून देण्याची शिफारस कार्यकारी मंडळ करीत आहे आणि गतवर्षीप्रमाणे यंदाही सभासदांचा लाभांश त्यांच्या १५ अंकीबचत खात्यामध्ये थेट जमा करण्याचे कार्यकारी मंडळाने ठरविले आहे. | 13 | **Dividend** : The Managing Committee proposes 9% dividend on Share Capital as on 31st March 2023 on pro-rata basis. This will be credited to respective 15 digit CBS Accounts as per the regular practice. |
| १४ | **कार्यकारी मंडळाच्या सभा** : अहवालसालात कार्यकारी मंडळाच्या एकूण १४ सभा झाल्या. या सर्व सभांना संचालकांची उपस्थिती समाधानकारक होती. | 14 | **Managing Committee Meeting** : During the year under report the Managing Committee held 14 meetings and attendance of the Committee Members for these meetings was satisfactory. |
| १५ | **हिशेब तपासणी** : अहवालसाली मे. रुपाली म्हसकर ॲण्ड कंपनी यांची अंतर्गत लेखापरिक्षक व माडखोलकर भावे चितळे ॲण्ड असो. (LLP) यांची वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या तपासणीबाबतचे अहवाल प्राप्त झाले असून संस्थेच्या सर्वांगीण कामकाजाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलेले आहे. तसेच वैधानिक लेखापरिक्षक माडखोलकर भावे चितळे ॲण्ड असो. (LLP) यांनी अहवाल सालाचे लेखापरिक्षण पूर्ण केले असून संस्थेला 'अ' ऑडिट वर्ग दिला आहे. | 15 | **Audit** : For the year under report M/s Rupali Mhaskar & Co. were appointed as our Internal Auditors and Government Auditors were Madkholkar Bhave Chitale & Asso. (LLP) We have received their Audit Report and they have conveyed their satisfaction regarding the overall working of the society & have awarded class "A" to the society. |
| १६ | **श्रध्दांजली** : संस्थेच्या दप्तरी नोंदी प्रमाणे अहवाल सालात आणि आजपर्यंत या अहवालात दिलेल्या चौकटीत नमूद केलेले संस्थेचे मान्यवर सभासद काळाने आपल्यापासून हिरावून नेलेले आहेत. त्यांच्या निधनामुळे या सभासदांच्या कुटुंबियांच्या दु:खात मी सहभागी आहे. | 16 | **Homage** : With my heart full of sympathies to the families of the members who have expired during the financial year and till the report of this General Meeting, we pay our homage to these departed souls and convey our deepest condolence. |

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

**सौ. शिवांगी साळुंके**
**खजिनदार**

## श्रध्दांजली /HOMAGE

| क्र. | सभासद नाव | शाखा | NO. | Members Name | Branch |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्व. श्रीमती. माया क्षिरसागर | उमरेड कॉलनी नागपूर | 1 | Late Smt. Kshirsagar Maya K. | Umred Colony |
| २ | स्व. श्री. जगन्नाथ सोनावणे | कसबे दिर्गज | 2 | Late Mr. Sonavane Jaganath D. | Kasbe Digraj |
| ३ | स्व. श्री. मुकूंद शिंदे | वांगणी | 3 | Late Mr. Shinde Mukund L. | Vangani |
| ४ | स्व. श्री. अमित रंजन | पटना | 4 | Late Mr. Ranjan Amit | Patna |
| ५ | स्व. श्री. विवेकानंद मंडलिक | क्षे. का. ठाणे | 5 | Late Mr. Mandlik Vivekanand | R. O. Thane |
| ६ | स्व. श्री. नथुराम पवार | अलिबाग | 6 | Late Mr. Pawar Nathuram R. | Alibaug |

# THE UNION BANK OF INDIA EMPLOYEES CO-OP CREDIT SOCIETY LTD.,MUMBAI
## PROFIT & LOSS A/C FOR THE PERIOD 1-4-2022 TO 31-03-2023

| 2021-22 | EXPENDITURE | 2022-23 | 2022-23 | 2021-22 | INCOME | 2022-23 | 2022-23 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **INTEREST PAID** | | | | **INTEREST EARN** | | |
| 2,64,12,008.00 | INT PAID ON SOD A/C UNION BANK | 6,16,86,204.00 | | 9,01,78,633.16 | INT.EARNED ON LONG LOANS | 13,81,19,510.31 | |
| 61,69,034.00 | INT PAID ON DHANLAXMI FDR | 75,86,854.00 | | 98,374.93 | INT.EARNED ON SHORT LOANS | 2,02,466.00 | |
| 1,05,78,958.00 | INT ON MDBS SUBS/MDB FUND | 1,21,32,949.00 | | 81,880.00 | INT.EARNED ON STAFF LOANS | 1,89,857.00 | |
| 52,22,090.00 | INT ON SURETY SUBS/FUND | 49,58,703.00 | | 9,205.00 | INT.EARNED ON SECURED LOAN | 0.00 | |
| 57,59,411.00 | INT PROVIDED ON VARIOUS FUNDS | 63,34,272.00 | | 35,513.00 | INTEREST EARN ON FD INVESTMENT | 8,250.00 | |
| 1,99,858.00 | INT ON CUM-SHR-DEP | 7,34,732.00 | 9,34,33,714.00 | 65,22,375.00 | INTEREST EARN ON RESERVE FUND | 63,85,990.00 | 14,49,06,073.31 |
| | | | | | | | |
| | **MANAGEMENT EXPENSES** | | | 51.00 | DIVIDEND ON MDCC SHARES | | 0.00 |
| 39,83,164.00 | STAFF SALARIES | 36,60,009.27 | | | | | |
| 2,60,383.00 | SOCIETY CONT.TO STAFF PF | 2,36,193.50 | | | | | |
| 15,588.00 | P.F. ADMIN CHARGES | 15,640.00 | | | | | |
| 30,600.00 | MEDICAL ALLOWANCE TO STAFF | 32,800.00 | | | | | |
| 93,044.00 | STAFF TERM INSURANCE | 1,02,674.00 | | | | | |
| 3,09,053.00 | STAFF HEALTH INSURANCE | 1,90,024.00 | | | | | |
| 23,711.00 | LEAVE FARE CONCESSION TO STAFF | 42,948.00 | | | | | |
| 8,250.00 | EXGRATIA PAID TO STAFF | 0.00 | | | | | |
| 7,277.00 | CONVEYANCE EXPENSES | 6,887.00 | | | | | |
| 15,061.00 | ENTERTAINMENT EXPENSES | 8,284.24 | | | | | |
| 1,63,298.00 | PRINTING & STATIONERY | 1,90,071.88 | | | | | |
| 27,746.00 | POSTAGE EXPENSES | 31,295.00 | | | | | |
| 1,529.18 | BANK CHARGES | 2,427.84 | | | | | |
| 3,235.00 | BOOKS & PERIODICALS | 2,506.00 | | | | | |
| 7,144.00 | COURIER EXPENSES | 1,488.32 | | | | | |
| 62,677.00 | OFFICE EXPENSES | 56,417.92 | | | | | |
| 21,677.00 | TELEPHONE BILL EXPENSES | 19,427.02 | | | | | |
| 1,557.00 | MISCELLANEOUS EXPENSES | 36,322.00 | | | | | |
| 92,652.00 | REPAIRS & MAINTENANCE | 37,116.00 | | | | | |
| 1,58,852.00 | MEMBER AWARENESS EXPENSES | 3,00,000.00 | | | | | |
| 4,125.00 | DAILY ALLOW.TO M.C.MEMBERS | 5,250.00 | | | | | |
| 82,696.00 | CONVEYANCE ALLOW.TO M.C.MEMBER | 1,04,608.00 | | | | | |
| 85,070.00 | MEETING ALLOWANCES | 68,620.00 | | | | | |
| 14,400.00 | HONORARIUM TO M.C.MEMBERS | 14,400.00 | | | | | |
| 73,128.00 | MANAGING COMM.MEETING EXPENSES | 49,655.00 | | | | | |
| 2,500.00 | PROFESSION TAX (EMPLOYER) | 2,500.00 | | | | | |
| 5,938.00 | FIDELITY INSURANCE | 0.00 | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2,16,018.00 | PROFESSIONAL FEES | 3,33,068.00 | | | | | |
| 3,186.00 | SAFE DEPOSIT LOCKER RENT | 3,186.00 | | | | | |
| 68,425.00 | GIFT EXPENSES | 57,202.86 | | | | | |
| 3,263.00 | POOJA EXPENSES | 6,265.00 | | | | | |
| 95,042.00 | CO-OP TRAINING EXPENSES | 37,883.74 | | | | | |
| 7,52,400.00 | FRANKING & BANK PROCESSING CHARGES | 12,03,500.00 | | | | | |
| 1,59,865.00 | A.G.M.EXPENSES | 4,14,049.48 | | | | | |
| 18,341.00 | HOLIDAY HOME AGREEMENT EXPENCES | 0.00 | | | | | |
| 4,850.00 | SUB.TO MUMBAI KOKAN SAL.EAR.SANGH | 2,000.00 | | | | | |
| 2,05,882.00 | OFFICE RENOVATION EXPENSES | 0.00 | | | | | |
| 2,72,735.32 | LOSS ON SALE OF ASSET | 0.00 | | | | | |
| 1,000.00 | APPEAL FILLING CHARGES | 0.00 | | | | | |
| 0.00 | ELECTION EXPENSES | 14,94,147.00 | | | | | |
| 0.00 | GST INPUT CGST A/C | 2,34,547.33 | | | | | |
| 0.00 | GST INPUT SGST A/C | 2,34,547.33 | | | | | |
| 20,65,405.00 | PROVISION FOR INCOME TAX FY 2022-23 | 19,97,984.00 | 1,12,35,945.73 | | | | |
| | | | | | | | |
| | **AUDIT FEES PROVISION** | | | | | | |
| 8,92,167.00 | STATUTORY AUDIT FEES | 8,86,406.00 | | | | | |
| 48,100.00 | INTERNAL AUDIT FEES | 50,000.00 | | | | | |
| 23,600.00 | TAX AUDIT FEES | 20,000.00 | 9,56,406.00 | | | | |
| | | | | | | | |
| | **OTHER PROVISION** | | | | | | |
| 0.00 | PROVISION FOR STANDARD ASSET | 14,11,180.00 | | | | | |
| 6,76,550.00 | PROVISION FOR GRATUITY TO STAFF | 2,53,320.00 | 16,64,500.00 | | | | |
| | | | | | | | |
| | **DEPRECIATION** | | | | | | |
| 1,20,500.77 | DEPRECIATION 40% (COMPUTER ) | 1,53,438.22 | | | | | |
| 45,089.47 | DEPRECIATION 10% (WOODEN) | 1,96,453.59 | | | | | |
| 21,221.56 | DEPRECIATION 15% (ELECTRONICS) | 59,515.29 | 4,09,407.10 | | | | |
| | | | | | | | |
| 3,13,36,676.79 | **TO NET PROFIT** | | 3,72,06,100.48 | | | | |
| **9,69,26,032.09** | **TOTAL Rs.** | | **14,49,06,073.31** | **9,69,26,032.09** | **TOTAL Rs.** | | **14,49,06,073.31** |

**Madkholkar Bhave Chitale & Asso.(LLP)**
**Chartered Accountant**

**Rajesh Matkari** – **Chairman**
**Bhattusingh Thakur** – **Vice Chairman**
**Prashant Surve** – **Secretary**
**Pravin Sonawale** – **Jt. Secretary**
**Shiwangi Salunke** – **Treasurer**

**DATE:** **12-05-2023**

**PLACE:** **MUMBAI**

# THE UNION BANK OF INDIA EMPLOYEES CO-OP CREDIT SOCIETY LTD.,MUMBAI

## BALANCE SHEET AS ON 31 MARCH 2023

| 2021-22 | CAPITAL & LIABILITIES | 2022-23 | 2022-23 | 2021-21 | PROPERTY & ASSETS | 2022-23 | 2022-23 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 50,00,00,000.00 | **AUTHORISED SHARE CAPITAL** | | 50,00,00,000.00 | | **CASH & BANK BALANCE** | | |
| 29,96,25,000.00 | **SHARE CAPITAL - PAID UP** | 29,96,25,000.00 | | 0.00 | CASH IN HAND | 328.00 | |
| | ADD: ISSUED SHARES | 7,16,70,000.00 | 37,12,95,000.00 | 4,50,10,000.00 | UNION BANK C.D.A/C-31183 | 3,00,10,000.00 | |
| | | | | 6,981.04 | MDCC BANK CURRENT A/C 481 | 5,043.04 | |
| 12,20,65,776.48 | **RESERVE FUND** | | | 5,735.62 | STAFF PF-MDCC BANK.BANK A\C | 6,535.62 | 3,00,21,906.66 |
| | AS PER LAST B/S | 12,20,65,776.48 | | | | | |
| | ADD:ENTRANCE FEES | 61,700.00 | | | **INVESTMENT** | | |
| | ADD: APPROPRIATION 2021-22 | 31,33,698.90 | | 12,20,55,000.00 | INVESTMENT F.D.RESERVE FUND | 12,54,62,000.00 | |
| | ADD: UNCLAIMED DIVIDEND 2018-19 | 2,00,995.00 | 12,54,62,170.38 | 10,01,091.00 | INVESTMENT F.D.STAFF GRATUITY | 8,84,591.00 | |
| | | | | 6,63,415.00 | INVESTMENT F.D.STAFF GRATUITY - LIC | 10,68,816.00 | |
| | **OTHER FUNDS** | | | 500.00 | SHARE TO MUMBAI KOKAN SAL.EAR. | 500.00 | |
| 39,63,741.99 | DIVIDEND EQUALISATION FUND | 42,33,405.99 | | 500.00 | SHARE TO MUMBAI SAL.EAR.SANGH | 500.00 | |
| 20,97,075.72 | BAD & DOUBTFUL DEBTS FUND | 22,40,739.72 | | 2,19,00,000.00 | INVESTMENT WITH UBI (LIQUIDITY) | 1,95,82,499.00 | |
| 4,43,455.09 | CHARITY FUND | 4,75,500.09 | | 1,000.00 | INVESTMENT MDCC BANK SHARES | 1,000.00 | 14,69,99,906.00 |
| 14,47,300.37 | NATURAL CALAMITY FUND | 15,47,104.37 | | | | | |
| 78,81,042.41 | BUILDING FUND | 84,15,124.41 | | 1,24,46,73,390.75 | **LONG LOAN** | | |
| 50,17,150.63 | DEPOSIT CONTINGENCY FUND | 62,12,536.01 | | | AS PER LAST B/S | 1,24,46,73,390.75 | |
| 4,01,951.65 | CULTURAL ACTIVITY FUND | 4,30,061.65 | | | ADD: ADVANCE DURING YEAR | 1,22,49,04,613.14 | |
| 5,74,686.00 | CO-OP TRAINING FUND | 6,66,261.00 | 2,42,20,733.24 | | LESS: RECOVERIES DURING YEAR | 66,08,07,720.69 | 1,80,87,70,283.20 |
| | | | | | | | |
| | **OTHER FUNDS [STAFF]** | | | 12,75,679.72 | **SHORT LOAN** | | |
| 3,396.22 | STAFF PROVIDENT FUND | 3,395.22 | | | AS PER LAST B/S | 12,75,679.72 | |
| 17,59,470.00 | STAFF GRATUITY FUND | 20,48,385.00 | 20,51,780.22 | | ADD: ADVANCE DURING THE YEAR | 71,04,367.00 | |
| | | | | | LESS: RECOVERIES DURING YEAR | 59,75,708.00 | 24,04,338.72 |
| | **MEMBERS WELFARE SCHEME** | | | | | | |
| 2,58,24,353.87 | MEMBER DEATH BENEVOLENT SCHEME | 3,57,94,207.87 | | | **OTHER ADVANCE** | | |
| 3,39,54,553.04 | SURETY GUARANTEE SCHEME | 3,81,24,456.04 | | 1,20,100.00 | STAFF FESTIVAL ADVANCE | 69,500.00 | |
| 10,86,113.39 | EDUCATION WELFARE SCHEME | 12,16,179.39 | | 11,44,507.00 | STAFF CLEAN LOAN | 31,47,834.00 | |
| 17,76,853.55 | HOLIDAY HOME SCHEME(SUBS.TIE UP) | 21,20,931.00 | | 0.00 | ADVANCE | 39,242.00 | |
| 1,15,06,028.37 | KARJ MUKTI HAMI YOJANA | 1,52,02,830.37 | | 0.00 | STAFF HOUSING LOAN | 24,75,859.00 | 57,32,435.00 |
| 1,30,20,670.69 | DHANWANTARI MEDICAL SCHEME | 1,65,00,786.69 | 10,89,59,391.36 | | | | |
| | | | | 3,46,095.89 | **FURNITURE & FIXTURE(COMPUTER)** | | |
| 3,56,88,540.28 | SURETY GUARANTEE SUBSCRIPTION(REFD) | 4,71,02,548.89 | | | AS PER LAST B/S | 3,46,095.89 | |
| 10,79,58,661.63 | M.D.B.S.SUBSCRIPTION [REFD] | 12,27,36,100.62 | | | ADD: CURRENT YEAR PURCHASE | 37,500.00 | |
| 2,79,07,726.73 | DHANWANTRI MEDICAL SUBS. (REFD) | 3,03,63,242.57 | | | LESS: DEPRECIATION @40% p.a. | 1,53,438.22 | 2,30,157.67 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 62,22,500.00 | CUMULATIVE SHARE DEPOSIT | 1,33,79,500.00 | 21,35,81,392.08 | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | **BORROWED FUND** | | | 19,64,537.06 | **FURNITURE & FIXTURE (WOODEN)** | | |
| 59,60,61,176.99 | UNION BANK SOD A/C - 35067 | | 99,71,71,477.92 | | AS PER LAST B/S | 19,64,537.06 | |
| | | | | | ADD: CURRENT YEAR PURCHASE | 0.00 | |
| | **DEPOSIT** | | | | LESS: DEPRECIATION @10% p.a. | 1,96,453.59 | 17,68,083.47 |
| 8,87,09,621.00 | DHANLAKSHMI F.D.FROM MEMBERS | 9,75,19,690.00 | | | | | |
| 22,08,903.00 | DHANLAXMI FD PAYABLE(MATURITY) | 28,08,915.00 | | 3,81,622.03 | **FURNITURE & FIXTURE (ELECTRONICS)** | | |
| 0 | RECURRING DEPOSIT | 7,81,000.00 | 10,11,09,605.00 | | AS PER LAST B/S | 3,81,622.03 | |
| | | | | | ADD: CURRENT YEAR PURCHASE | 18,747.88 | |
| | **AUDIT FEES PAYABLE** | | | | LESS: DEPRECIATION @15% p.a. | 59,515.29 | 3,40,854.62 |
| 7,69,704.00 | STATUTORY AUDIT FEES PAYABLE | 9,12,163.00 | | | | | |
| 18,000.00 | TAX AUDIT FEES PAYABLE | 18,000.00 | | | **OTHER ASSETS** | | |
| 36,000.00 | INTERNAL AUDIT FEES PAYABLE | 45,000.00 | 9,75,163.00 | 4,500.00 | TELEPHONE DEPOSIT | 0.00 | |
| | | | | 27950 | BANK CHARGES RECEIVABLE | 4,602.00 | |
| | **UNCLAIMED DIVIDEND** | | | 0.00 | MISCELLANIOUS RECEIVABLES | 1,400.00 | |
| 2,81,095.00 | 50TH DIVIDEND 2018-19 | 0.00 | | 2,970.00 | ACCRUED INTEREST ON INVESTMENT | 0.00 | |
| 2,69,042.00 | 51ST DIVIDEND 2019-20 | 1,01,020.00 | | 13,35,000.00 | PREPAID EXPENDITURE(HOLIDAY-HOME) | 8,79,600.00 | |
| 1,24,205.00 | 52ND DIVIDEND 2020-21 | 83,705.00 | | 9,240.00 | T.D.S. RECOVERABLE | 9,240.00 | |
| 0 | 53RD DIVIDEND 2021-22 | 96,563.00 | 2,81,288.00 | 6,67,000.00 | TAX PAID ON CIT APPEAL AY 2015-16 | 6,67,000.00 | |
| | | | | 6,89,916.00 | TAX PAID ON CIT APPEAL AY 2016-17 | 6,89,916.00 | |
| | **LIABILITIES & PROVISIONS** | | | 21,90,391.00 | INCOME TAX AY-2017-18 | 21,90,391.00 | |
| 93,06,852.00 | DHANLAXMI FD.INT.PAYABLE(MATURITY) | 1,04,10,147.00 | | 28,60,998.00 | INCOME TAX AY-2018-19 | 28,60,998.00 | |
| 199858 | INT PAYABLE ON CUM-SHR-DEP | 7,34,732.00 | | 27,90,185.00 | INCOME TAX AY-2019-20 | 27,90,185.00 | |
| 31,14,873.00 | PROVISION FOR STANDARD ASSEST | 45,26,053.00 | | 24,08,736.00 | INCOME TAX AY-2020-21 | 24,08,736.00 | |
| 64,111.00 | SUNDRY PAYABLES | 67,613.00 | | 25,34,745.00 | INCOME TAX AY-2021-22 | 25,34,745.00 | |
| 14,400.00 | HONORARIUM TO M.C.MEM.PAYABLE | 14,400.00 | | 20,65,405.00 | INCOME TAX AY-2022-23 | 20,65,405.00 | |
| 1,63,917.00 | T.D.S.ON BILLS PAYABLE | 1,42,870.00 | | 0.00 | BALANCE WITH TAX AUTHORITY AY-2023-24 | 19,97,984.00 | 1,91,00,202.00 |
| 1,93,610.00 | ELECTION EXPN PROVISION | 0.00 | | | | | |
| 14,130.00 | FESTIVAL GIFT 0.50% 2020-21 | 10,055.00 | | | | | |
| 0.00 | FESTIVAL GIFT 0.50% 2021-22 | 5,755.00 | | | | | |
| 1,417.00 | TELEPHONE BILLS PAYABLE | 1,417.00 | | | | | |
| 1,67,208.00 | PROFSSINAL FEES PAYABLE | 2,08,883.00 | | | | | |
| 4,081.00 | EXGRATIA PAYABLE TO STAFF | 0.00 | | | | | |
| 1,400.00 | PROFESSIONAL TAX EMP | 1,400.00 | | | | | |
| 90.00 | UNION FEES | 0.00 | | | | | |
| 0.00 | SURETIES RECOVERY | 22,931.00 | | | | | |
| 0.00 | POSTAGE EXPN PAYABLE | 30,649.00 | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 0.00 | MISCELLANEOUS EXP.PAYABLE | 16,297.00 | | | | | |
| 0.00 | HOLIDAY-HOME PAYABLES | 12,150.00 | | | | | |
| 21,90,391.00 | INCOME TAX AY-2017-18 | 21,90,391.00 | | | | | |
| 28,60,998.00 | INCOME TAX AY-2018-19 | 28,60,998.00 | | | | | |
| 27,90,185.00 | INCOME TAX AY-2019-20 | 27,90,185.00 | | | | | |
| 24,08,736.00 | INCOME TAX AY-2020-21 | 24,08,736.00 | | | | | |
| 25,34,745.00 | INCOME TAX AY-2021-22 | 25,34,745.00 | | | | | |
| 20,65,405.00 | INCOME TAX AY-2022-23 | 20,65,405.00 | | | | | |
| 0.00 | INCOME TAX PAYABLE AY-2023-24 | 19,97,984.00 | 3,30,53,796.00 | | | | |
| | | | | | | | |
| 3,13,36,989.01 | **PROFIT AND LOSS A\C** | | | | | | |
| | BALANCE PROFIT | 269.66 | | | | | |
| | PROFIT TRF FROM P&L A/C | 3,72,06,100.48 | 3,72,06,370.14 | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| **1,45,81,37,191.11** | **TOTAL Rs.** | | **2,01,53,68,167.34** | **1,45,81,37,191.11** | **TOTAL Rs.** | | **2,01,53,68,167.34** |

**Madkholkar Bhave Chitale & Asso.(LLP)**
**Chartered Accountant**

**Rajesh Matkari** — **Chairman**
**Bhattusingh Thakur** — **Vice Chairman**
**Prashant Surve** — **Secretary**
**Pravin Sonawale** — **Jt. Secretary**
**Shiwangi Salunke** — **Treasurer**

**DATE:** 12-05-2023

**PLACE:** MUMBAI

## Budget Statement for the financial year 2023-24

| Sr No | Expenditure | 2022-23 Budgeted | As on Mar 2023 | Excess Expenditure | 2023-24 Budget |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Staff Salary, PF, LTA, Medical, Bonus, Gratuity Ex-gratia | 55,00,000.00 | 42,80,289.00 | - | 60,00,000.00 |
| 2 | Meeting allowance, Conveyance Honorarium, Meeting expenses, Daily allowance to M.C. Member | 10,00,000.00 | 2,42,533.00 | - | 10,00,000.00 |
| 3 | Management Expenses: Conveyance, entertainment, postage & Courier, Tax & other. | 25,00,000.00 | 26,16,872.00 | 1,16,872.00 | 30,00,000.00 |
| 4 | Printing & Stationary, Computer Stationary | 3,50,000.00 | 1,90,072.00 | - | 3,50,000.00 |
| 5 | A.G.M. Expenses | 10,00,000.00 | 4,14,049.00 | - | 10,00,000.00 |
| 6 | Depreciation | 4,00,000.00 | 4,09,407.00 | 9,407.00 | 4,00,000.00 |
| 7 | Statutory Audit fees, Internal Audit fees, Tax Audit fees | 12,00,000.00 | 9,56,406.00 | - | 15,00,000.00 |
| 8 | Income Tax | 25,00,000.00 | 19,97,984.00 | - | 25,00,000.00 |
| 9 | Election Expn | 0 | 14,94,147.00 | 14,94,147.00 | 3,00,000.00 |
| 10 | Provisions for Standard Assets | 0 | 14,11,180.00 | 14,11,180.00 | 18,00,000.00 |
| | **Total** | **1,44,50,000.00** | **1,40,12,939.00** | **30,31,606.00** | **1,78,50,000.00** |

# Profit Distribution 2022-23

| | | |
|---|---|---|
| 1 | राखीव निधी (१०%)<br>Reserve Fund (10%) | 37,20,637.01 |
| 2 | लाभांश (९%)<br>Dividend (9%) | 2,98,15,388.00 |
| 3 | सणासुदीची भेट (०.५०%)<br>Festival Gift (0.50%) | 16,56,338.00 |
| 4 | विश्रामगृह (५%)<br>Holiday Home (5%) | 18,60,318.51 |
| 5 | सहकार प्रशिक्षण निधी<br>Co-Op Training Fund | 25,000.00 |
| 6 | इमारत निधी<br>Building Fund | 2,000.00 |
| 7 | लाभांश समिकरण निधी<br>Dividend Equalisation Fund | 2,000.00 |
| 8 | थकित कर्ज निधी<br>Bad & Doubtful Debts Fund | 2,000.00 |
| 9 | शैक्षणिक गुणगौरव निधी<br>Education Welfare Fund | 75,000.00 |
| 10 | सांस्कृतिक कार्यक्रम निधी<br>Cultural Activity Fund | 2,000.00 |
| 11 | नैसर्गिक आपत्ती निधी<br>Natural Calamity Fund | 2,000.00 |
| 12 | धर्मादाय निधी<br>Charity Fund | 2,000.00 |
| 13 | ठेव आकस्मिकता निधी<br>Deposit Contingency Fund | 41,500.00 |
| 14 | शिल्लक नफा<br>Balance Profit | 188.62 |
| | **Total Profit** | **3,72,06,370.14** |

# वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा कलम ८१ (५-बी) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

मी दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडिट सोसायटी मर्यादित या संस्थेचे दि. ३१.०३.२०२३ रोजीचे ताळेबंद पत्रक आणि त्या दिवशी संपणा-या आर्थिक वर्षाचे नफा-तोटा पत्रक लेखापरीक्षण करुन सोबत जोडलेले आहेत. हि हिशोब पत्रके तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. या आर्थिक पत्रकाचे लेखापरिक्षण करुन त्यावर मत प्रदर्शित करण्याची आमची जबाबदारी आहे.

साधारणतः भारतामध्ये स्विकृत झालेल्या लेखापरिक्षण मान्यकानुसार आम्ही संस्थेचे लेखापरीक्षण केलेले आहे. या लेखापरिक्षण मान्यकानुसार आम्ही लेखापरिक्षण कार्यक्रम आखून व त्याप्रमाणे काम करुन विश्वासपूर्वक असे पाहिले आहे की, सदर आर्थिक पत्रकात कोणतेही महत्वाचे दोष राहू नयेत. लेखापरीक्षणात चाचणी तपासणी तसेच आर्थिक पत्रकांतील रकमांच्या संदर्भात कागदपत्रे तपासून या रकमा पत्रकात योग्यरित्या दाखविलेल्या असल्याबद्दलची खात्री करणे त्याचप्रमाणे मान्यता प्राप्त लेखांकन सिद्धांताप्रमाणे आर्थिक पत्रकांचे मुल्यांकन या लेखापरीक्षणात समाविष्ट आहे. त्यामुळे आम्ही केलेल्या लेखापरीक्षणाप्रमाणे प्रस्तुत वाजवीरीत्या मत प्रदर्शित करण्याबद्दल आम्हाला खात्री आहे.

त्याचप्रमाणे मी अभिप्राय देतो की,

१) आमच्या लेखापरीक्षणाच्या संदर्भात, आमच्या ज्ञानाप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे, आम्ही संस्थेकडून मागितलेली सर्वमाहिती व स्पष्टीकरणे आम्हाला समाधानकारक वाटली.

२) संस्थेचे ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रके ही महाराष्ट्र सहकारी सोसायटयांचा कायदा व त्याखालील नियमानुसार तयार केलेली आहेत.

३) संस्थेचे ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रके ही संस्थेच्या हिशोबी व विवरणे याबरोबर मिळती जुळती आहेत.

४) माझ्या मते मला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार त्याचप्रमाणे या आर्थिक पत्रकावर दिलेल्या स्वतंत्र टिपणानुसार आणि अलहिदा दिलेल्या शे-यास पात्र राहून तसेच भारतामध्ये साधारणतः स्विकृत असलेल्या लेखापरीक्षण मान्यकानुसार :

अ) ताळेबंद पत्रक सोसायटीची दि. ३१ मार्च, २०२३ ची खरी व योग्य स्थिती दाखविते

ब) नफा -तोटा पत्रक दि. ३१ मार्च, २०२३ रोजी संपलेल्या वर्षाचा खरा व योग्य नफा दर्शविते.

५) सन २०२२-२०२३ या सहकारी वर्षासाठी लेखापरीक्षण वर्ग **"अ"** देण्यात आला आहे.

६) वरिल दाखला प्रसारित करण्यात येणा-या लेखापरीक्षण प्रतिवृत्तातील भाग अ ब क मधील शे-यास पात्र राहून देण्यात येत आहे.

सही/-

**माडखोलकर भावे चितळे ॲण्ड असो. (LLP)**

सनदी लेखापाल

ठिकाण : मुंबई

दिनांक : १२ मे, २०२३

# उपविधीतील शब्दरचना दुरुस्ती

| उपविधी क्रमांक | अस्तित्वात असलेली उपविधी शब्दरचना | बदलण्यात आलेली उपविधी शब्दरचना | बदलण्याचे कारण |
|---|---|---|---|
| क- १.३ | **अधिकृत भागभांडवल**<br>संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये ५०,००,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास कोटी मात्र) असेल. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रु. ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त राहील) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २८ मधील तरतुदीस अधिन राहून सभासदास जास्तीत जास्त भाग धारण करता येतील तथापि प्रत्येक सभासदास रु. २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) पर्यंतचे भाग धारण करता येईल व त्यापुढील त्याची दरमहा येणारी रक्कम सभासद संचित ठेवीमध्ये घेता येईल. संचित ठेवीमध्ये घ्यावयाची रक्कम सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने ठरवावयाची असून ठरल्याप्रमाणे प्रत्येक सभासदांने दरमहा नियमितपणे संस्थेला सभासदांचे वेतनातून कपात करुन घेण्याचा अधिकार संस्थेला राहील. त्या ठेवीवरील व्याजाचा दर व्यवस्थापक समिती निश्‍चित करील व वार्षिक सभेच्या मंजूरीने सदर व्याज दिले जाईल. व्याजाचा दर सभासद कर्ज व्याजाच्या दरापेक्षा कमी असला पाहिजे. | **अधिकृत भागभांडवल**<br>संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये ६०,००,००,०००/- (अक्षरी रुपये साठ कोटी मात्र) असेल. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रु. ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त राहील) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २८ मधील तरतुदीस अधिन राहून सभासदास जास्तीत जास्त भाग धारण करता येतील तथापि प्रत्येक सभासदास रु. २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) पर्यंतचे भाग धारण करता येईल व त्यापुढील त्याची दरमहा येणारी रक्कम सभासद संचित ठेवीमध्ये घेता येईल. संचित ठेव मर्यादा १.०० लाख गाठल्यानंतर सदर रक्कम मुदतठेवीत गुंतवणूक करावी. संचित ठेवीमध्ये घ्यावयाची रक्कम सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने ठरवावयाची असून ठरल्याप्रमाणे प्रत्येक सभासदांने दरमहा नियमितपणे संस्थेला सभासदांचे वेतनातून कपात करुन घेण्याचा अधिकार संस्थेला राहील. त्या ठेवीवरील व्याजाचा दर व्यवस्थापक समिती निश्‍चित करील व वार्षिक सभेच्या मंजूरीने सदर व्याज दिले जाईल. व्याजाचा दर सभासद कर्ज व्याजाच्या दरापेक्षा कमी असला पाहिजे. | वसूल भागभांडवलात होणारी वाढ |
| फ – १.३ | **पदाधिकारी निवड**<br>१.निवडणुक झाल्यानंतर व्यवस्थापक समितीची पहिली सभा एक महिन्याच्या आत बोलविली पाहीजे. निवडून आलेल्या सदस्यांमधून अध्यक्ष/उपाध्यक्ष/मानद सचिव/खजिनदार यांची निवड केली जाईल. त्यांची मुदत पाच वर्षे राहील. व्यवस्थापक समितीच्या सर्व सभांचे अध्यक्षपद अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत उपाध्यक्ष भुषवितील आणि दोघांचे गैरहजेरीत व्यवस्थापक समितीचे निवडून आलेले सदस्य आपल्यातून एकाची अध्यक्षपदासाठी निवड करतील.<br>२.सभेच्या अध्यक्षास स्वतःच्या मता व्यतिरिक्त एक निर्णायक मताचा वापर पदाधिका-यांच्या निवडणुकीत करता येणार नाही अशा वेळी निर्णय चिठ्ठया टाकून घेण्यात येईल. | **पदाधिकारी निवड**<br>१.निवडणुक झाल्यानंतर व्यवस्थापक समितीची पहिली सभा एक महिन्याच्या आत बोलविली पाहीजे. निवडून आलेल्या सदस्यांमधून अध्यक्ष/ उपाध्यक्ष/ मानद सचिव/ सहसचिव/ खजिनदार यांची निवड केली जाईल. त्यांची मुदत पाच वर्षे राहील. व्यवस्थापक समितीच्या सर्व सभांचे अध्यक्षपद अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत उपाध्यक्ष भुषवितील आणि दोघांचे गैरहजेरीत व्यवस्थापक समितीचे निवडून आलेले सदस्य आपल्यातून एकाची अध्यक्षपदासाठी निवड करतील.<br>२.सभेच्या अध्यक्षास स्वतःच्या मता व्यतिरिक्त एक निर्णायक मताचा वापर पदाधिका-यांच्या निवडणुकीत करता येणार नाही अशा वेळी निर्णय चिठ्ठया टाकून घेण्यात येईल. | सहसचिव पद समाविष्ट केल्यामुळे |
| फ – १.४ | **व्यवस्थापक समिती सदस्य पदाच्या निवडणूकीसाठी पात्रता**<br>१.व्यवस्थापक समिती निवडणुकीत भाग घेऊ इच्छिणारा सभासद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २७ ची पूर्तता करीत असला पाहिजे.<br>२.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम आणि उपविधी यातील तरतूदीनुसार तो निवडणूक लढविण्यास अपात्र असता कामा नये. | **व्यवस्थापक समिती सदस्य पदाच्या निवडणूकीसाठी पात्रता**<br>१.व्यवस्थापक समिती निवडणुकीत भाग घेऊ इच्छिणारा सभासद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २७ ची पूर्तता करीत असला पाहिजे.<br>२.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम आणि उपविधी यातील तरतूदीनुसार तो निवडणूक लढविण्यास अपात्र असता कामा नये.<br>३.व्यवस्थापक समितीत भाग घेऊ इच्छिणा-या सभासदाने निवडणूक कार्यक्रम प्रसिद्धी दिनांकापूर्वी किमान २४ महिने आधी मुदत ठेवीत किमान रु. ५०,०००/- गुंतवणूक करणे अनिवार्य असेल.<br>४.व्यवस्थापक समितीत भाग घेऊ इच्छिणा-या सभासदाने सभासद झाल्याच्या दिनांकापासून संस्थेतून किमान एकदा कर्ज घेणे अनिवार्य असेल.<br>५. व्यवस्थापक समितीत भाग घेऊ इच्छिणा-या सभासद संस्थेचा किंवा इतर कोणत्याही संस्थेचा थकबाकीदार नसावा.<br>६. व्यवस्थापक समितीत भाग घेऊ इच्छिणा-या सभासदाने महाराष्ट्र शासनाचा किमान १५ वर्षे वास्तव्याचा पुरावा देणे अनिवार्य आहे.<br>७. व्यवस्थापक समितीत भाग घेऊ इच्छिणा-या सभासदाने लगतच्या आर्थिक वर्षात किमान ३ वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असणे अनिवार्य आहे. | व्यवस्थापक समिती सदस्यपदाच्या निवडणूक पात्रता नवीन नियम समाविष्ट केल्यामुळे |
| फ – १.८ | गणपूर्ती-(कोरम)<br>व्यवस्थापक समितीचे सदस्यसंख्येपैकी किमान ५० टक्के पेक्षा जास्त सदस्य हजर असले म्हणजे गणपूर्ती (कोरम) झाली असे समजावे. मात्र तज्ञ व कार्यलक्षी संचालकांना गणपूर्तीकरता गणले जाणार नाही. | गणपूर्ती-(कोरम)<br>व्यवस्थापक समितीचे सदस्यसंख्येपैकी (सेवानिवृत्ती किंवा इतर कारणास्तव कमी झालेल्या सदस्यांना वगळून) किमान ५० टक्के पेक्षा जास्त सदस्य हजर असले म्हणजे गणपूर्ती (कोरम) झाली असे समजावे. मात्र तज्ञ व कार्यलक्षी संचालकांना गणपूर्तीकरता गणले जाणार नाही. | गणपूर्ती बदल समाविष्ट केल्यामुळे |

# ५४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची क्षणचित्रे














युनियन बँक ऑफ इंडियाने CAPS सुविधा संस्थेमध्ये सुरु केली याप्रसंगी मुख्य महाप्रबंधक श्री. योगेंन्द्र सिंह, सहाय्यक महाप्रबंधक श्री. श्रीप्रसाद भालवणकर तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री. राजेश मतकरी व सचिव श्री. प्रशांत सुर्वे उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाची क्षणचित्रे





# दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई.

## संस्थेचा अधिकारी व कर्मचारी वर्ग



**श्री. आनंद जी. येजरे**
वरिष्ठ व्यवस्थापक
(मो. नं. ९८३३१६९८२१)



**श्री. सुहास तानाजी जाधव**
व्यवस्थापक
(मो. नं. ८४२४०३९१७५)



**सौ. स्नेहल ते. कोकणे**
सहाय्यक व्यवस्थापक



**श्री. विजय बा. सावंत**
लिपिक
(मो. नं. ९८६०९०२४२२)



**श्री. हेमंत अ. गडकरी**
लिपिक
(मो. नं. ९६३७८०१८७०)



**श्री. विवेक गं. पवार**
लिपिक
(मो. नं. ९६६४६४५०६१)



**श्री. तन्मय स. परब**
लिपिक
(मो. नं. ९५९४१२५८७२)


**दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई.**
युनियन बँक बिल्डिंग, ४ था मजला, रुम नं.११, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र. २२६२९४८४, ३५११४२४६, ३५११४२५२
WhatsApp No.: ९८३३१८५५८४ / ईमेल : ubicrsoc@gmail.com / Website : unionbankcreditsociety.com / Play store : UBI CR SOCIETY


**कार्यालयीन वेळ : सकाळी १०:१५ ते सायंकाळी ०५:१५**

# सन २०२३ कॅलेंडरचे अनावरण कार्यक्रमाची क्षणचित्रे

**युनियन बँक ऑफ इंडियाच्या व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी सुश्री. ए. मणिमेखलै मॅडम, संस्थेचे अध्यक्ष श्री. राजेश मतकरी, सचिव श्री. प्रशांत सुर्वे आणि संचालक श्री. रोहन गोडसे**






**कार्यकारी संचालक श्री. रजनीश कर्नाटक साहेब**



**कार्यकारी संचालक श्री. एस. रामसुब्रमण्यम साहेब**



**कार्यकारी संचालक श्री. नितेश रंजन साहेब**

**महाराष्ट्र शासनाचे मा. सहकारमंत्री श्री. अतुलजी सावे साहेब यांना संस्थेतर्फे सदिच्छा भेट देताना अध्यक्ष श्री. राजेश मतकरी**



# संस्थेतील निवृत्त सभासदांच्या सत्कार सोहळ्याची क्षणचित्रे






# सर्व सभासदांसाठी खुशखबर

## संस्थेत ठेवी ठेवून व्याज मिळवण्याची सुवर्ण संधी

| धनलक्ष्मी ठेवीची मुदत | व्याजदर |
|---|---|
| ३ महिने | ६.५०% |
| ६ महिने | ६.७५% |
| १२ महिने | ७.५०% |
| २४ महिने | ८.००% |
| आवर्त ठेव १२ महिने | ७.९०% |
| १२ महिने (सेवानिवृत्त सभासद ६० वर्षावरील) | ९.५०% |